# भारतातील बेरोजगारीची समस्या

**प्रा. बालाजी गंगाधरराव दमकोंडवार**
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय,
ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर
Email : damkondwarb@gmail.com

---

**प्रस्तावना :**

भारत हा तरुणांची संख्या सर्वाधिक असणारा देश आहे. तरुणांच्या माध्यमातून प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्यासाठी मुबलक मनुष्यबळ भारतात उपलब्ध आहे. परंतु या तरुणांना सध्याच्या काळात बेरोजगारी सारख्या ज्वलंत समस्येचा सामना करावा लागत आहे. वाढत्या लोकसंख्येला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्थिर रोजगार असणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा बेरोजगारीमुळे इतर अनेक समस्यांचे चक्र सुरु होते. बेरोजगारीची हि समस्या केवळ विकसनशील आणि अविकसित देशातच आहे असे नाही तर इंग्लंड, अमेरिका सारख्या विकसित देशातही आहे. बेरोजगारी ही अशी अवस्था आहे की, ज्यात एखादा व्यक्ती काम करण्यास योग्य असूनही त्यावेळच्या प्रचलित मजुरी अथवा परिश्रमाच्या दराने काम करण्याची इच्छा ठेवत असूनही त्याला काम मिळत नाही. बेकारी म्हणजे अशी स्थिती होय की, जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो परंतु त्याला काम मिळत नाही. म्हणजेच इच्छा आणि पात्रता असूनही काम न मिळणे, रोजगारापासून वंचित राहणे म्हणजेच बेरोजगारी होय. डॉ आर सी सक्सेना यांच्या मते, “जी व्यक्ती काम करण्याच्या दृष्टीने लायक आहे आणि काम करण्याची इच्छा आहे , त्या व्यक्तीला प्रचलित मजुरीच्या दराने काम न मिळणे म्हणजेच बेरोजगारी होय.” बेरोजगारी ही समाजातील अर्थव्यवस्था, उत्पन्नाची मर्यादा आणि मनुष्यबळ यांच्याशी निगडीत असणारी समाजिक समस्या आहे. बेरोजगारी निश्चित करण्यासाठी तीन आधारभूत तत्व आहेत. व्यक्तीमध्ये काम करण्याची क्षमता असणे, काम करण्याची इच्छा असणे आणि व्यक्तीने काम शोधण्यासाठी प्रयत्न करणे, या तिन्ही बाबी असूनही जर व्यक्तीला रोजगार मिळत नसेल तर त्या अवस्थेला बेरोजगारी असे म्हंटले जाते. [१]

बेकारी हि समस्या आजची नसून गेली ३५ ते ४० वर्षापासून ही समस्या भारतात गंभीर रूप धारण करीत आहे. १९७० च्या दशकात बेरोजगारी बरोबरच महागाई, धान्य टंचाई अशा समस्या निर्माण झाल्या होत्या. नोकरी नाही म्हणून पोट भरण्याचे साधन नाही अशा अवस्थेत राज्यव्यवस्थेबद्दल लोकांच्या मनात अपेक्षा निर्माण होतात. ७० ते ८० च्या दशकात राजकीय नेत्यांच्या भाषणात बेरोजगारी निर्मुलन हा प्रमुख मुद्दा असायचा. विरोधी पक्ष सरकारवर बेरोजगारी निर्मुलन करण्यासाठी काहीच प्रयत्न करत नसल्याबद्दल जोरदार टिका करायचे. १९९० च्या दशकात बेरोजगारी, दारिद्र्य या समस्ये ऐवजी मंदिर, मंडल आयोग यासारख्या भावनिक विषयांना राजकीय नेत्यांनी प्रचाराच्या केंद्रस्थानी आणले. २००० नंतर जागतिकीकरणाच्या लाटेत आणि इंटरनेटच्या युगात राजकारण्यांनाच नव्हे तर संपूर्ण समाजालाच बेरोजगारीच्या समस्येचा विसर पडल्यासारखे झाले होते. परंतु तरुणांची वाढती संख्या, तंत्रज्ञानाचा विकास, यांत्रीकीकरण, जागतिक स्पर्धा, मुक्त व्यापाराचे धोरण अशा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून पुढील दशकात बेरोजगारीची समस्या तीव्रतेने वाढत गेली आणि भारतीय समाजातील गंभीर समस्या बनली. [२]

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने ‘ जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टीकोन प्रवाह २०१८’ (World Employment and Social Outlook Trends – 2018 ) बाबतचा एक अहवाल प्रकाशित केला. भारतात २०१७ मध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या १८.३ दशलक्ष होती. या अहवालानुसार २०१८ मध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या १८.६ दशलक्ष आणि २०१९ मध्ये हि संख्या १८.९ दशलक्ष पर्यंत वाढण्याशी शक्यता दर्शविण्यात आली होती. तसेच या अहवालात असेही नमूद करण्यात आले कि २०१७ मध्ये बेरोजगारी आणि सामजिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जागतिक बँकेचा बेरोगारी संबंधीचा अहवाल २०१८ मध्ये प्रसिद्ध झाला. प्रस्तुत अहवालानुसार भारतात दर महिन्याला १.३ दशलक्ष तरुणांना नोकरीची गरज आहे. तर दरवर्षी ८ दशलक्ष रोजगाराची आवश्यकता आहे. बेरोजगारीच्या समस्येमुळे इतर कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्याही निर्माण झाल्या आहेत म्हणूनच या समस्येचे अध्ययन सर्वच शास्त्रात सखोलपणे केले जात आहे. याबाबत संशोधन होणे म्हणूनच आवश्यक ठरते.

**बिजशब्द :** बेरोजगारी, लोकसंख्या वृद्धी, आर्थिक मंदी

**उद्देश :**

१. भारतातील बेरोजगारीच्या समस्येचे स्वरूप समजून घेणे.

२. भारतातील बेरोजगारीच्या समस्येची करणे जाणून घेणे.

३. बेरोजगारीच्या समस्येच्या परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:**

या शोध निबंधात आशय विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम तथ्यांच्या उपलब्धतेसाठी पुस्तके, मासिके, संशोधन जर्नल्स, इंटरनेटवरील लेख , संकेतस्थळे इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**बेरोजगारीची कारणे :**

**१. कृषी क्षेत्राचे मागासलेपण :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजदेखील देशातील बहुसंख्यांक लोकांचा व्यवसाय हा शेती आणि शेतीशी निगडीत आहे. भारतातील ग्रामीण भागात अजूनही पारंपारिक पद्धतीने शेती करण्याचे प्रमाण खूप अधिक आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात अदृश्य बेरोजगारी आहे. भारतातील कृषी क्षेत्र अजूनही अविकसित आणि मागासलेले असल्याने लोकांना वर्षभर रोजगार मिळत नाही. कृषी क्षेत्रात हंगामी बेरोजागारीचे प्रमाण खूप अधिक आहे. निसर्गावर आधारित शेती, शेतीमालाचे कमी उत्पन्न, बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्यानुसार अन्नधान्याचे उत्पादन नसणे, इत्यादींमुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण भागात बेरोजगारीची समस्या तीव्रतेने वाढत आहे.

**२. लोकसंख्या वृद्धी :**

भारतातील लोकसंख्या वृद्धीचा दर सतत वाढत आहे. २००१ मध्ये भारतातील लोकसंख्या १०२ कोटी होती. २०११ मध्ये १२१ कोटीपर्यंत वाढली. सध्या २०२४ मध्ये भारताची लोकसंख्या १४४ कोटीपेक्षा अधिक झाली आहे. तसेच भारतातील तरुणांचे प्रमाण देखील वाढत आहे. तरुणांचे प्रमाण वाढत असल्याने रोजगाराची

मागणी सतत वाढत आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार वाढत नाही. भारतातील सरकारी नोकऱ्यांची संख्यादेखील मर्यादित आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे देखील रोजगाराचे प्रमाण कमी होत आहे. एकंदरीत वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगारात वाढ होत नसल्याने बेरोजगारीची समस्या गंभीरपणे वाढत आहे.

**३. कुटीर आणि लघुउद्योगांचा ऱ्हास :**

पूर्वी ग्रामीण भागात कुटीर उद्योग मोठ्या प्रमाणात होते. तालुका आणि शहरी भागात लघुउद्योग मोठ्या प्रमाणात असायचे. मोठ्या प्रमाणात लोक कुटीर आणि लघुउद्योगात काम करायचे. परंतु औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे कुटीर आणि लघु उद्योगांचा ऱ्हास झाला. कारखान्यात तयार झालेल्या वस्तू स्वस्त आणि टिकाऊ असल्याने लोकांमध्ये त्याची मागणी सतत वाढत गेली. पूर्वी ग्रामीण समुदायात हातमाग उद्योग, तेल काढणे, गुळ तयार करणे, साबण तयार करणे, अनेक जीवनावश्यक वस्तू तयार करण्यासाठी कुटीर आणि लघुउद्योग होते. परंतु औद्योगीकीकरणानंतर कुटीर आणि लघु उद्योगांचा ऱ्हास झाला. त्यामुळे ग्रामीण समुदायातील लोकांचा रोजगार बंद झाला आणि भारतातील बेरोजगारीची समस्या अधिक गंभीर बनली.

**४. जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी :**

भारतातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती असला तरी सिंचनाच्या सुविधा पुरेश्या नाहीत. बहुतांश शेतकऱ्यांना आपल्या शेतीसाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. नैसर्गिकरित्या योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता नसल्याने शेतीच्या उत्पादनावर याचा परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थीक नुकसानीला तोंड द्यावे लागते. सिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्याने शेती करणे परवडत नाही. तसेच वर्षभर शेतीतून उत्पन्न मिळू शकत नाही. अशावेळी लोकांना इतर रोजगार उपलब्ध होत नाही. परिणामतः बेरोजगारांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**५. सदोष शिक्षण पद्धती:**

आजची शिक्षण पद्धती ही दोषपूर्ण आहे. कारण शिक्षणातून पदवीधर तरुण तरुणी निर्माण केले जातात, परंतु रोजगाराभिमुख शिक्षण नसल्याने या सर्वच शिक्षित तरुणांना रोजगार मिळत नाही. बाजारपेठेच्या मागणीनुसार शिक्षणातून कौशल्यपूर्ण आणि दर्जेदार शिक्षण घेणारे तरुण निर्माण होत नाहीत. म्हणून त्यांना रोजगार मिळत नाही. सुशिक्षित लोक श्रमाला महत्व देत नाहीत, म्हणून भारतात उद्योजकतेचा विकास होताना दिसत नाही. प्रत्येक सुशिक्षित तरुणाला नौकरी हवी असते, परंतु उपलब्ध नौकऱ्यापेक्षा कितीतरी पटीने तरुणांची संख्या अधिक असल्याने बेरोजगारीच्या समस्येने तीव्र स्वरूप धारण केले आहे.

**६. सदोष नियोजन :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजित पद्धतीने विकास करण्याचा प्रयत्न झाला. परंतु नियोजन योग्य पद्धतीने करण्यात आले नाही. रोजगार, उद्योग, शिक्षण, व्यवसाय इत्यादींच्या संदर्भात नियोजन करण्यात आले असले तरी त्याची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. राज्यकर्ते, व्यापारी, आणि इतर लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी नियोजनानुसार काम केले जात नाही. त्यामुळे नियोजनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक त्रुटी राहतात. अशा सदोष नियोजनामुळे दिवसेंदिवस बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**६. आर्थिक मंदी :**

आर्थिक मंदीच्या काळात देशात उत्पादन मोठ्या प्रमाणात असते. परंतु त्या उत्पादनास मागणी कमी असते. त्यामुळे वस्तूच्या किमती कमी होतात. उद्योजकांचे यामुळे फार मोठे नुकसान होते म्हणून ते आपले उत्पादन कमी करतात. उत्पादन कमी करायचे असल्याने नवीन रोजगार निर्माण होत नाही, उलट कामगारांना कामावरून कमी केले जाते. म्हणूनच मंदीच्या काळात बेरोजगारांच्या संख्येत वाढ होते.

**७. भौगोलिक गतीशिलतेचा अभाव :**

आधुनिक काळात व्यक्तीला आपल्या गावात किंवा शहरातच रोजगार मिळेल असे नाही. रोजगार किंवा नौकरीसाठी इतर ठिकाणी जावे लागते. उद्योगांचे, कारखान्यांचे केंद्रीकरण शहरात तसेच महानगरात मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे बहुसंख्य लोकांना स्थलांतरित व्हावे लागते. बहुतांश लोकांना आपल्या शहरातच रोजगार मिळावा असे वाटते. रोजगारासाठी इतर ठिकाणी जाण्यास ते तयार नसतात. अशा भौगोलिक गतीशिलतेच्या अभावी बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**८. कमी बचत आणि गुतंवणूक :**

लोकांना बचतीची सवय असली तरी देशातील लोकांच्या बचतीचे प्रमाण कमी आहे. लोकांमार्फत होणारी बचत कमी असल्याने बँकेत कर्जासाठी पुरेसे भांडवल निर्माण होत नाही. नवीन उद्योगधंदा सुरु करण्यासाठी किंवा जुन्या उद्योगधंद्यात गुंतवणूक करणे आवश्यक असते. परंतु बँकांमध्ये लोकांच्या बचतीचा पैसा कमी असल्याने भांडवलदारांना पुरेसे कर्ज मिळत नाही. कमी बचतीमुळे कमी गुंतवणूक केली जाते. त्यामुळे रोजगार कमी निर्माण होतो, परिणामी बेरोजगारीचे प्रमाण वाढते.

**९. वैयक्तिक कारणे :**

काही सुशिक्षित लोकांना आपल्या पात्रतेपेक्षा कमी पात्रता असलेले काम करणे आवडत नाही. यामध्ये ते आपला अपमान समजतात. सध्या स्थितीत विविध पदांवरील भरतीची प्रक्रिया अतिशय संथ गतीने सुरु आहे. अशावेळी सामान्य स्वरुपाची कामे, किंवा नौकरी उपलब्ध असूनही असे काम करण्यास अनेकजन तयार नसतात. अशा वेळी बेरोजगारीचे प्रमाण वाढते. [३]

**बेरोजगारीचे परिणाम :**

**१. कौटुंबिक विघटन :**

बेरोजगारीचा प्रतिकूल परिणाम सर्वप्रथम कुटुंबावर जाणवतो. कुटुंबप्रमुख जर बेरोजगार असेल तर त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. गरजा पूर्ण करण्यासाठी कर्जबाजारी व्हावे लागते. आर्थिक समस्या आणि कर्जामुळे वैफल्यात जीवन जगावे लागते. रोजगार नसला तरीही अन्न धान्याची गरज असतेच, कुटुंबाचे भरणपोषण करावे लागते. सततच्या वैफल्यग्रस्त परिस्थितीमुळे कुटुंबात वाद आणि अशांतता निर्माण होते. या सर्वांचा परिणाम म्हणून कुटुंबातील सामाजिक संबंधात दुरावा निर्माण होऊनसंघर्षात्मक परिस्थिती निर्माण होते. परिणामी कौटुंबिक विघटन घडून येते.

**२. गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ :**

कोणत्याही व्यक्तीला काम करण्याची इच्छा असूनही जर काम मिळत नसेल तर अशा व्यक्ती आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होत जाते. पुरेश्या रोजगाराअभावी स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या गरजा

भागविणे शक्य होत नसल्याने उपासमारीने मरण्यापेक्षा चोरी, दरोडे टाकून जीवन जगणे चांगले असे विचार व्यक्तीच्या मनात येतात. अशा हलाखीच्या परिस्थितीत मृत्यूला सामोरे जाण्याची वृत्तीही स्वीकारण्याची तयारी व्यक्तीची असल्याने चोरी, लुटमार व वेळप्रसंगी खुनासारख्या गुन्ह्याकडे व्यक्ती वळतात. परिणामतः समाजात गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. बेरोजगारीमुळे युवकांचे विचार विध्वंसक विचारांकडे वळत जातात. समाजविरोधी आणि गुन्हेगारी वर्तनात भाग घेण्याचे प्रमाण यामुळे वाढते.

**३. सामाजिक प्रश्नांमधील वाढ :**

बेरोजगारी अनेक सामाजिक प्रश्नांना जन्म देणारी प्रक्रिया आहे. बेकारीमुळे भिक्षावृत्ती, दारिद्र्य, उपासमार, चोरी आणि गुन्ह्याचे प्रमाण वाढते. बेरोजगारीच्या स्थितीत असलेल्या अनेक व्यक्ती खून, भ्रष्टाचार, लुटमार असे विध्वंसक मार्ग स्वीकारतात. त्यामुळे समाज आणि प्रशासनापुढे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. बेरोजगार तरुण पैसा कमविण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करतात. प्रसंगी दहशतवादाच्या गटात सामील होऊन समाजविघातक कृत्ये करून समाजाला वेठीस धरतात. त्यामुळे समाजात भय निर्माण होते. बेकारीने सामाजिक आणि आर्थिक विषमतेचा प्रश्न निर्माण होतो. अशा अनेक समस्या बेरोजगारीच्या प्रभावाने निर्माण होतात.

**४. श्रमशक्तीचा नाश :**

कुठल्याही देशात उपलब्ध असणारी मानवी साधनसंपत्ती हा खऱ्या अर्थाने दीर्घकालीन फायदा देणारा घटक आहे. गुणवत्तापूर्ण गतिमान अशी श्रमशक्ती देशाचा विकास साधण्यास मदत करते. अशी श्रमशक्ती जगात स्पर्धात्मकतेचा मूलाधार ठरते. परंतु अशा श्रमशक्तीला कामच नसेल तर बेकार तरुणांचे श्रम व्यर्थ जातात. पर्यायाने देशाच्या श्रमशक्तीचा नाश होतो. म्हणजेच श्रमशक्ती व्यर्थ गेल्याने देशात आर्थिक संकट निर्माण होते. श्रमशक्तीचा साठा करता येत नसल्याने बेकारीमुळे श्रमशक्ती व्यर्थ जाते.

**५. व्यसनाधीनतेत वृद्धी :**

सततच्या बेरोजगारीने व्यक्तीची निराशाजनक स्थिती निर्माण होते. आर्थिक टंचाई, हताश जीवन आणि मानसिक तणाव यामुळे व्यक्ती मद्यपानाकडे वळतात. दारू, गांजा आणि इतर मादक पदार्थांचे सेवन करून स्वतःचे दुःख विसरण्याचा प्रयत्न करतात आणि व्यसनाधीनतेच्या गर्तेत अडकतात. बेकार व्यक्ती व्यसनाधीनतेमुळे अनेक अनैतिक आणि हिंसात्मक कृत्यात सहभागी होतात. वाढत्या बेरोजगारीमुळे समाजात अशा व्यासनाधीन लोकांचे प्रमाण वेगाने वाढते.

**६. श्रमशक्तीचे शोषण :**

कुठल्याही व्यक्तीच्या हाताला काम मिळत नसेल तर अल्प मजुरीत काम करण्यास असे व्यक्ती तयार असतात. उपाशी राहण्यापेक्षा अल्प मजुरीत आपण श्रम विकतो याची जाणीव श्रमिकांना असते. बेकारीमुळे आपण शोषणाचे बळी ठरत आहोत याची कल्पनाही त्यांना असते. परंतु स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या उपासमारीला थांबविण्यासाठी व्यक्ती असे शोषण स्वीकारतात. बेरोजगारीमुळे उद्योजकांना बाजार भावापेक्षा कमी किंमतीत श्रमिक उपलब्ध होतात, परिणामी श्रमशक्तीचे मूल्य घसरते. बेरोजगारीमुळे उद्योजक, ठेकेदार आणि व्यापारी कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या श्रमशक्तीचे अनियंत्रित शोषण करतात.

**७. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अस्थिरता :**

कुठलाही उद्योग आर्थिक मंदीमुळे बंद झाला तर अनेक कुशल आणि अकुशल कामगारांवर बेरोजगार

राहण्याची वेळ येते. अशा पद्धतीने बेरोजगार होणारे कामगार स्वतःच्या समस्या शासनदरबारी मांडण्याकरिता इतर उद्योगधंदे काही काळ बंद ठेवण्याचे आंदोलन करतात. अशावेळी देशाचे आर्थिक नुकसान होऊन अस्थिरता निर्माण होते. देशातील कुशल, अकुशल आणि अर्धकुशल कामगार जेव्हा बेकारीमुळे संपावर जातात तेंव्हा हिंसात्मक, संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होते. अशा संप आणि आंदोलनाचा फायदा घेण्यासाठी काही राजकीय नेते अशा आंदोलनाला पाठींबा देतात, नवीन पक्ष स्थापन करतात. पर्यायाने देशात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अस्थिरता निर्माण होते. अशा आर्थिक आणि सामाजिक समस्या सोडविण्याकरिता राजकीय धोरणकर्त्यांना विविध प्रकारे कर लावावा किंवा वाढवावा लागतो. बेरोजगारांना बेकारी भत्ता, बंद उद्योगांना आर्थिक अनुदान, महागाई नियंत्रणाचे उपाय या सर्व गोष्टी करताना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अस्थिरता निर्माण होते.

**८. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मागासलेपण :**

बेकारीमुळे बचतीवर परिणाम होऊन देशाच्या अर्थव्यवस्थेत मंदीची लाट येते आणि उद्योगधंद्यांचा विकास होत नाही, उत्पादनात घट होते. त्यामुळे स्पर्धात्मकता आणि कार्यक्षमता कमी होते. अशा वेळी सरकारला कराचा बोजा वाढवून कल्याणकारी योजनांमध्ये कपात करावी लागते. करांमुळे उत्पादित वस्तू महागड्या होऊन परिणामी निर्यातीवर परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर कुठलीही वस्तू महाग असेल तर मागणी कमी होते, तसेच बेकारीमुळे उत्पादित वस्तूंना उठाव नसल्याने देशांतर्गतही वस्तूची मागणी कमी होते. अशा काळात वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन होऊन त्यातून तेजीमंदीची चक्रे उदभवत राहतात. पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था मंद गतीने वाटचाल करते, यामुळे आंतरराष्ट्रीय स्पधेत देश मागे पडतो. [४]

अशा प्रकारे बेरोजगारीमुळे देशातील क्रियाशील श्रमशक्ती उपलब्ध असूनही उपयोगात येत नाही. असे शिक्षित तरुण विधायक कार्यात सहभागी राहण्याएवजी त्यांचे शोषण होताना दिसून येते. विविध प्रश्नांना तोंड देत असताना हतबलतेमुळे असे तरुण समाजविरोधी, अनैतिक आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामावले जातात. एकंदरीतच बेरोगारीमुळे व्यक्तिगत, कौटुंबिक पातळीवर नुकसान होते. तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अस्थिरताही यातून निर्माण होते.

**संदर्भसूची :**


- कऱ्हाडे बी. एम. (२०१३) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या भाग २ . नागपूर: पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स. पृष्ठ क्र. ४१-४३
- मोह्बंशी अजयकुमार, पवार सुरेंद्र . (२०१८) भारतीय समाज :संरचनात्मक मुद्दे. नागपूर: साई ज्योती पब्लिकेशन. पृष्ठ क्र. १७९
- आगलावे प्रदीप, आगलावे सरोज (२०१८ ) भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन. पृष्ठ क्र. ११६- १२१
- पाटील प्रमोद (२०१८ ) भारतीय समाज प्रश्न आणि वर्तमान समस्या. नागपूर: श्री अंशुल प्रकाशन. पृष्ठ क्र. १२४- १२७